MHRT080000322022

नियमित दिवाणी दावा नंबर ३/२०२२

**निशाण ४३ वरील आदेश**

१. वादी क्र. २ ने सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये केलेला आहे. प्रस्तुतचे प्रकरण वादीने प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकतीमध्ये रस्ता करण्याचे व त्यांच्या डांबरीकरणाचे आणि मजबुतीचे काम करु नये याचकरीता निरंतर मनाईचा आदेश करणेबाबत दाखल केला आहे. मात्र दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी क्र. १ व २ यांनी या रस्त्याचे काम पूर्ण केलेले आहे. सबब पॅरा नं. ५ च्या शेवटी दाव्यामध्ये "दावा दाखल झाल्यावर प्रतिवादी क्र. १ व २ यांनी सदरहू वाद मिळकतीतील रस्त्याचे काम पूर्ण केलेले आहे. तरी वाद मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ व २ यांनी केलेले रस्त्याचे काम बेकायदेशीर आहे असा ठराव होवून मिळावा” असा मजकूर नमुद करण्यासाठी दावा दुरुस्तीचा अर्ज आहे. त्याचप्रमाणे दाव्यातील पॅरा नं. ११ मध्ये अ च्या अखेरीस वाद मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ व २ यांनी केलेल्या रस्त्याचे काम बेकायदेशिर आहे असा ठराव होवून मिळावा ही देखील दुरुस्ती या दावा दुरुस्तीच्या अर्जातुन मागितलेली आहे.

२. सदरच्या अर्जावर प्रतिवादीचे म्हणणे मागविले असता त्यांनी म्हणणे दाखल केले आहे. त्याच्यामते हा अर्ज विलंबाने दाखल केलेला आहे. दावा दाखल झाल्यावर पुढील काही दिवसातच अर्जात नमुद परिस्थितीची वादीला जाण होती. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

३. अर्ज पाहिला. त्यावरील म्हणणे पाहिले. अभिलेखाचे अवलोकन केले. खालील मुद्दे माझ्या विचारासाठी येत असून त्यावर मी खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दोन्ही पक्षातील वादातील खरा प्रश्न ठरविण्यासाठी प्रस्तावित दुरुस्ती आवश्यक आहे काय ? | होय |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारण मिमांसा

१. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की हा दावा प्रतिवादी विरुध्द निरंतर ताकीदीसाठी केलेला आहे व त्या अन्वये प्रतिवादींनी रस्ता डांबरीकरणाचे आणि मजबुतीकरणाचे काम करु नये अशी मागणी केलेली आहे. वादी क्र. २ चे असे कथन आहे की दरम्यानचे काळात प्रस्तावित रस्त्याचे काम पूर्ण झाले असून त्याबाबत मुळ दाव्यामध्ये कोणतीही मागणी केलेली नाही. सबब ती मागणी करण्यासाठी प्रस्तावित दावा दुरुस्ती मागितली आहे. सदरची दावा दुरुस्ती मान्य केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच वादी मागित असलेली दुरुस्ती ही वाद विषयक घडामोडी संदर्भात असून त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तसेच प्रतिवादींना सदर दुरुस्तीबाबत जादा कैफियत देवून बचाव देण्याची संधी आहे. दाव्याचे पुराव्याकामी चौकशी अदयाप सुरु झालेली नाही. वादी सुचवित असलेली दुरुस्ती ही पक्षकारामध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न न्यायोचित करण्यासाठी आवश्यक ठरते. सबब वरील बाबीचा विचार करता या अर्जाच्या कामी पुढील आदेश पारी करण्यात येतो.

२. म्हणून मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र. २ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु ५००/- इतका खर्च प्रतिवादींना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादीने सदरची दुरुस्ती आदेशापासून १४ दिवसाच्या आत करुन दुरुस्त प्रत न्यायालयात दाखल करावी.

३. दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ६ नियम १७ अन्वये वादीने सदर आदेशाच्या तारखेपासुन १४ दिवसात अथवा पुढील तारखेस दावा दुरुस्ती न केल्यास सदरचा आदेश रद्द करणेत येईल. सबब वादीने नेमलेल्या तारखेला दावा दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करावी.

३. दोन्ही पक्षकारांनी आदेशाची नोंद घ्यावी.

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2023.03.04 14:56:41 +0530

स्थळ - देवरुख
दिनांक २३/०२/२०२३

(श्रुती ह. पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
देवरुख

**CERTIFICATE**

order in R.C.S. No.3-2022 Exh. 43

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | T. N. Khade (Jr. Clerk) |
| Court name | : | Jt. Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 23/02/2023 |
| Order signed by the presiding officer on | : | 23/02/2023 |
| Order uploaded on | : | 28/02/2023 |